# जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१
दूरध्वनी : २६५५६७९९ फॅक्स : २६५५६८०५ ई.मेल :collectormsd@gmail.com

---

क्र.: सी/कार्या-२ आय/कावि-१७२/२०२०
दिनांक : ०६/०९/२०२१.

**प्रति,**
मा. विभागीय आयुक्त, कोंकण विभाग,
कोंकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई

**विषय :** Destruction of Mangroves near sea breeze building, near Shiniya Mahadev Temple, Versoava, Andheri west Mumbai ...**(तक्रार क्र. १८२/१)**

**संदर्भ :** १. आपलेकडील दिनांक ०५/११/२०२० रोजीच्या पत्रासोबत श्रीम. श्वेता भट्ट यांचा दिनांक २६/१०/२०२० रोजीचा अर्ज.
२. उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांचेकडील अहवाल क्र. उविअ/मुंपउ/कार्या-५/कावि-१३८/२०२० दि. ११/०८/२०२१.

महोदय,

उपरोक्त विषयांकित प्रकरणी आपलेकडील संदर्भ क्र. च्या पत्रान्वये श्रीम. श्वेता भट्ट यांचा मौजे वर्सोवा ता. अंधेरी येथील शिवगल्ली सिन्या महादेव मंदिराजवळ कांदळवन परिसरात डेब्रिजची भरणी करुन कांदळवनाचा ऱ्हास होत असलेबाबतचा दि. २६/१०/२०२० रोजीचा तक्रार अर्ज या कार्यालयास प्राप्त झाला असून सदर तक्रारींच्या अनुषंगाने कारवाई करुन केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करणेकामी आपणांस या कार्यालयाकडून कळविनेनूसार पविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांनी संदर्भ क्र. २ अन्वये केलेल्या कार्यवाहीबाबतचा पुढीलप्रमाणे अहवाल या कार्यालयास सादर केलेला आहे.

सदर तक्रारींच्या अनुषंगाने मौजे वर्सोवा ता. अंधेरी येथील स.नं. ८३/अ या शासकीय मिळकतीवरील अनधिकृत अतिक्रमणे निष्कासन कार्यक्रम दि. २९/०७/२०२१ रोजी आयोजित करण्यात आला होता. मौजे वर्सोवा येथील वेसावे शिवकर कोळी समाज ट्रस्टच्या कमानीला लागूल असलेल्या स.नं. ८३/अ या शासकीय मिळकतीवरील अनधिकृत कच्या स्वरुपाच्या ५ झोपड्यांचे जे.सी.बी.च्या सहय्याने निष्कासित करण्यात आलेले आहेत. तसेच कांदळवनापासून ५० मीटरच्या आत असलेले मासे सुकविण्याचे मांडव आणि सिमेंटचे चौथरे निष्कासित करण्यात आलेले आहेत.

सदर तक्रारींच्या अनुषंगाने गाव अभिलेख पाहता मौजे वर्सोवा ता. अंधेरी येथील स.नं. ८३/अ या कांदळवन क्षेत्र असलेली मिळकत भारतीय वन अधिनियम, १९२७ चे कलम ४ अन्वये दि.१६/१०/२०१८ रोजीच्या अधिसूचनेअन्वये राखीव वने म्हणून अधिसूचित झालेली असून दि. ०९/०४/२०२१ रोजीच्या ताबपावती अन्वये वन विभागाकडे हस्तांतरीत करणेत आलेली आहे. त्याबाबत सदर मिळकतीच्या ७/१२ सदरी फेरफार क्र. १०७३ दि. ०५/०५/२०२१ अन्वये नोंद घेण्यात आलेली आहे.



Scanned by CamScanner

सदर प्रकरणी तक्रारदार श्रीमती श्वेता भट्ट यांनी केलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने अनधिकृत अतिक्रमणे निष्कासित करण्यात आलेली असल्याने सदर तक्रारींच्या मुद्दा संपुष्टात आल्याने सदर तक्रार बंद करणेस विनंती आहे.

सदर प्रकरणी पुढील माहितीसाठी सविनय सादर.

**( निलिमा धायगुडे )**
**समन्वय अधिकारी,**
**कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती**
**तथा अपर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर**

**प्रत : मा. सदस्य सचिव, कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती तथा उप वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांना माहितीसाठी**

Scanned by CamScanner

१०१/४५२

महाराष्ट्र शासन

# उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, ९ वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पू) ,मुंबई ४०० ०५१ .
दूरध्वनी क्रं. ०२२-२६५१०१३६
ईमेल- sdomsdest@gmail.com

क्र. उविअ/मुंपउ/कार्या-५/कावि-१३८/२०२०
दि. ११/०८/२०२१

Cms/21/22108
आ.नि. 23115

प्रति,
मा. जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा कार्यालय
दिनांक :- 12 AUG 2021
आवक क्र.:-
अधिकारी शाखा
12/8

**विषय :** Destruction of Mangroves near sea breeze building near shiniya mahadev temple versova andheri west Mumbai

**संदर्भ :** १) आपलेकडील पत्र क्र. सी / कार्या -२ आय / कावि - १७२ / २०२०, दि. २२/०१/२०२१
२) तहसीलदार अंधेरी यांचेकडील पत्र क्र. तह / अंधेरी / जमीन / कावि - ६२९ / २०२०, दि.०५/०८/२०२१

उपरोक्त विषयांकीत प्रकरणी आपल्याकडील संदर्भीय पत्र क्र.१ अन्वये तक्रारीत नमुद जागा तक्रारदार श्रीम. श्वेता भट यांनी मौजे वर्सोवा, ता. अंधेरी येथील शिवगल्ली सिन्या महादेव मंदिराजवळ कांदळवन परिसरात डेब्रीजची भरणी करुन कांदळवनाचा ऱ्हास होत असलेबाबत तक्रार केली होती. सदर तक्रार अर्ज पुढील कार्यवाहीसाठी तहसीलदार अंधेरी यांचेकडे पाठविला असता, त्यांनी संदर्भीय पत्र क्र.२ अन्वये अहवाल सादर केला आहे.

मौजे वर्सोवा, ता. अंधेरी येथील स. क्र. ८३/अ या शासकीय मिळकतीवरील अनधिकृत अतिक्रमणे निष्कासन कार्यक्रम दि. २९/०७/२०२१ रोजी आयोजित करुन मंडळ अधिकारी अंधेरी, तलाठी सझा वर्सोवा, वनपरिक्षेत्र अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक वन विभाग यांचे कार्यालयामार्फत वनपाल अंधेरी आणि वनसंरक्षक, तसेच मौजे वर्सोवा पोलीस ठाणेचे पोलीस अधिकारी, पोलीस हवालदार व महिला पोलीस, बृहन्मुंबई महानगरपालिके मार्फत श्री. मनीष टाके, सहा. अभियंता व पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

मौजे वर्सोवा येथील वेसावे शिवकर कोळी समाज ट्रस्टच्या कमानीला लागून असलेल्या स. क्र. ८३/अ या शासकीय मिळकतीवरील अनधिकृत कच्च्या स्वरुपाच्या ५ झोपडयांचे जेसीबीच्या सहाय्याने

Scanned by CamScanner

निष्कासीत करण्यात आलेले आहेत. तसेच कांदळवनापासून अंदाजे ५० मिटरच्या आत असलेले मासे सुकविण्याचे मांडव आणि सिमेंटचे चौथरे इत्यादी निष्कासित करण्यात आले आहेत.

सदर मिळकतीबाबत गांव अभिलेख पाहता सदरची कांदळवन जमीन ही महाराष्ट्र शासनाच्या अधिसूचनेनुसार "**राखीव वन**" म्हणून अधिसूचित झालेली असून, सदर जमिनीचा ताबा यापूर्वी दि. ०९/०४/२०२१ रोजी वन विभागाकडे देण्यात आला आहे. त्यानुसार स. क्र.८३/अ चे सातबारा इतर हक्क सदरी "**राखीव वन**" असा शेरा फेरफार नोंद क्र. १०७३, दि. ०५/०५/२०२१ अन्वये घेण्यात आला आहे.

तक्रारदार श्रीमती श्वेता भट यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने अनधिकृत अतिक्रमणे निष्कासित करण्यात आली असल्याने आणि तक्रारीचा मुद्दा संपुष्टात आला असल्यामुळे सदर प्रकरण प्रलंबित प्रकरणामधून वगळण्यास विनंती आहे.

(उमेश बिरारी)
**उपविभागीय अधिकारी,**
**मुंबई पश्चिम उपनगर**

Scanned by CamScanner

महाराष्ट्र सत्यमेव जयते शासन

# तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अंधेरी यांचे कार्यालय

दादाभाई नौरोजी रोड, अंधेरी पश्चिम, मुंबई – ४०००५८

दुरध्वनी क्रमांक : 022-26231368 ई-मेल आयडी : tahsildarandheri@gmail.com

क्र.तह/अंधेरी/जमीन/कावि-६२९/२०२०

दिनांक:-०५/०८/२०२१

प्रति,

मा.उपविभागीय अधिकारी,

मुंबई पश्चिम उपनगर

**विषय:-** Destruction of Mangroves near sea breeze building near shiniya mahadev temple versova andheri west Mumbai

**संदर्भ:-** १) श्रीम.श्वेता भट यांची ईमेल तक्रार दिनांक २६/१०/२०२०

२) मा.जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडील पत्र क्रमांक सी/कार्या-२ आय/कावि-१७२/२०२०, दि.०२/१२/२०२०

३) या कार्यालयाचे समक्रमांकाचे पत्र दिनांक १०/११/२०२०

४) या कार्यालयाचे समक्रमांकाचे पत्र दिनांक ०८/०१/२०२१

५) नगर भूमापन अधिकारी अंधेरी यांचेकडील पत्र क्रमांक न.भू.अ.वर्सोवा/बा.क्र.५७/२०२०/३९ दिनांक १८/०१/२०२१

६) मंडळ अधिकारी अंधेरी व तलाठी वर्सोवा यांचेकडील पत्र क्रमांक मं.अ.अं/बा.क्र.८०/२०-२१, दि.३०/०७/२०२१

उपविभागीय अधिकारी, मुंबई प. उपनगर
संकलन ........ ५
09
आवक क्र. 2753
सहाय्यक, उ.वि.अ.

Check and put up

उपरोक्त विषयांकीत प्रकरणी संदर्भीय पत्र क्रमांक ०१ अन्वये तक्रारदार श्वेता भट यांनी मौजे वर्सोवा ता.अंधेरी येथील शिवगल्ली सिन्या महादेव मंदिराजवळ कांदळवन परीसरात डेब्रीजची भरणी करुन कांदळवनाचा ऱ्हास होत असलेबाबत तक्रार केली होती. त्यानुषंगाने मौजे वर्सोवा ता.अंधेरी येथील स.क्र.८३/अ या शासकीय मिळकतीवरील अनधिकृत अतिक्रमणे निष्कासन कार्यक्रम दिनांक २९/०७/२०२१ रोजी आयोजित करण्यात आला होता.

त्यानुसार दिनांक २९/०७/२०२१ रोजी मंडळ अधिकारी अंधेरी यांनी तलाठी वर्सोवा, वनपरीक्षेत्र अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक वन विभाग यांचे कार्यालयामार्फत वनपाल अंधेरी आणि वनसंरक्षक तसेच बृहन्मुंबई महानगर पालिका मार्फत मनिष टाके, सहा. अभियंता, मुकादम,१ JCB आणि वर्सोवा पोलीस ठाणे यांचे कार्यालयामार्फत ०१ अधिकारी , ७ पोलीस हवालदार व २ महीला पोलीस यांचे सह उपस्थित राहून मौजे वर्सोवा येथील वेसावा शिवकर कोळी समाज ट्रस्ट च्या कमानीला लागुन असलेल्या स.क्र.८३/अ शासकीय मिळकतीवरील अनधिकृत कच्चा स्वरुपाच्या ५

Scanned by CamScanner

झोपड्यांचे JCB च्या सहाय्यने पुर्णपणे निष्कासन करण्यात आले आहे. तसेच कांदळवनापासून अंदाजे ५० मीटरच्या आत असलेले मासे सुकविण्याचे मांडव आणि सिमेंटचे चौथरे इत्यादीचे निष्कासन करण्यात आले आहे.।

सदर मिळकतीबाबत गांव अभिलेख पाहता सदरची कांदळवन जमीन ही महाराष्ट्र शासनाचे अधिसूचनेनुसार **"राखीव वन"** म्हणून अधिसुचीत झालेली असून सदर जमीनीचा ताबा यापूर्वी दिनांक ०९/०४/२०२१ रोजी वन विभागाकडे देण्यात आलेला आहे. अणि त्यानूसार स.क्र.८३/अ चे ७/१२ इतर हक्क सदरी "राखीव वन" असा शेरा नमूद करण्यात आलेला आहे.

तरी प्रकरणी संदर्भीय पत्र क्र.०१ अन्वये प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने अनधिकृत अतिक्रमणे निष्कासित करण्यात आली आहे. त्याबाबतचा स्थानिक पंचनामा नोंदविला आहे. तसेच अतिक्रमण निष्कासनापूर्वीचे आणि निष्कासनानंतरचे फोटो काढण्यात आले आहे. सदरचे प्रकरण या कार्यालयाच्या प्रलंबित प्रकरणांमधून वगळणेस विनंती आहे. तरी सदरचा अहवाल पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात येत आहे.

सोबत – तलाठी अहवाल , पंचनामा व निष्कासन कार्यवाही दरम्यानचे फोटो जोडले आहेत.

आपला विश्वासू,

(सचिन भालेराव)

**तहसीलदार अंधेरी**

Scanned by CamScanner

अहवाल दिनांक : 03/08/2021

# महाराष्ट्र शासन

## गाव नमुना सात ( अधिकार अभिलेख पत्रक )

[ महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या ( तयार करणे व सुस्थितीत ठेवणे ) नियम, १९७१ यातील नियम ३,५,६ आणि ७ ]

गाव :- वर्सोवा तालुका :- अंधेरी जिल्हा :- मुंबई उपनगर जिल्हा

भूमापन क्रमांक व उपविभाग : 83/अ

भू-धारणा पध्दती : सरकार शेताचे स्थानिक नाव :

| क्षेत्र, एकक व आकारणी | खाते क्र. | भोगवटादाराचे नांव | क्षेत्र | आकार | पो.ख. | फे.फा. | कुळ, खंड व इतर अधिकार |
|---|---|---|---|---|---|---|---|
| क्षेत्राचे एकक हे.आर.चौ.मी<br>अ) लागवड योग्य क्षेत्र<br>जिरायत -<br>बागायत -<br>इतर 13.05.35<br>एकुण ला.यो. क्षेत्र 13.05.35<br>ब) पोट-खराब क्षेत्र (लागवड अयोग्य)<br>वर्ग (अ) -<br>वर्ग (ब) -<br>एकुण पो.ख. 0.00.00<br>एकुण क्षेत्र (अ+ब) 13.05.35<br>आकारणी 0.00<br>जुडी किंवा विशेष आकारणी - | 320 | खाजण | 13.05.35 | | | ( 526 ) | कुळाचे नाव व खंड<br>इतर अधिकार<br>इतर<br>या पैकी जमीन 511 गुंठे जागा वेसावा चर्च कडे दिली आहे. ( 124 )<br>इतर<br>काहि भागावर मॅन्ग्रोव्हज (तिवराची झाडे) आहेत. ( 995 )<br>[~~इतर~~]( 1063 )<br>[~~यापैकी जमीन 2 एकर 20 गुंठे जागा नामदेव नारायण व भाऊ गोविंद भाटे 30 0 0~~]( 1063 )<br>इतर<br>"राखीव वन" क्षेत्र 6.02.4 हे. आर.चौ.मी. ( 1073 )<br>प्रलंबित फ़ेरफ़ार : नाही.<br>शेवटचा फेरफार क्रमांक : 1073 व दिनांक : 05/05/2021 |
| जुने फेरफार क्र. ( 509 )( 962 )( 1018 )( 1019 )( 1021 )( 1032 ) | | | | | | | सीमा आणि भूमापन चिन्हे : |

## गाव नमुना बारा ( पिकांची नोंदवही )

[ महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या ( तयार करणे व सुस्थितीत ठेवणे ) नियम,१९७१ यातील नियम २९ ]

गाव :- वर्सोवा तालुका :- अंधेरी जिल्हा :- मुंबई उपनगर जिल्हा

भूमापन क्रमांक व उपविभाग : 83/अ

| | | | पिकाखालील क्षेत्राचा तपशील | | | | | | | | | लागवडीसाठी उपलब्ध नसलेली जमीन | | जल सिंचनाचे साधन | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मिश्र पिकाखालील क्षेत्र | | | | | | निर्भेळ पिकाखालील क्षेत्र | | | | | | |
| | | | | | | घटक पिके व प्रत्येकाखालील क्षेत्र | | | | | | | | | |
| वर्ष | हंगाम | खाता क्रमांक | | | | पिकाचे नाव | जल सिंचित | अजल सिंचित | पिकाचे नाव | जल सिंचित | अजल सिंचित | स्वरूप | क्षेत्र | | |
| (१) | (२) | (३) | *४ | *५ | *६ | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) | (१५) | (१६) |
| | | | | | | | हे.आर. चौ.मी | हे.आर. चौ.मी | | हे.आर. चौ.मी | हे.आर. चौ.मी | | हे.आर. चौ.मी | | |

टीप : *४ - मिश्रणाचा संकेत क्रमांक, *५ - जल सिंचित, *६ - अजल सिंचित

"शासकीय कामासाठी निशुल्क प्रत."
दिनांक :- 03/08/2021
सांकेतिक क्रमांक :- 27220001000000011008202111

( नाव :- गणेश त्र्यंकट लोहार )
तलाठी साझा :- वर्सोवाता :- अंधेरी जि :-मंबई उपनगर
तलाठी सजा वर्सोवा
तालुका-अंधेरी



Scanned by CamScanner

गाव नमुना ६
फेरफार नोंदवही ( फेरफार पत्रक )
[ महाराष्ट्र जमीन महसुल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या ( तयार करणे व सुस्थितीत ठेवणे ) नियम, १९७१ यातील नियम १० ]

गाव :- वर्सोवा    तालुका :- अंधेरी    जिल्हा :- मंबई उपनगर

| नोंदीचा अनुक्रमांक | संपादन केलेल्या अधिकाराचे स्वरुप | परिणाम झालेले भुमापन व उपविभाग क्रमांक | अधिकाऱ्याचे नाव , आद्याक्षरी व शेरा |
|---|---|---|---|
| 1073 | फेरफाराचा प्रकार : अनोंदणीकृत<br>नोंदीचा प्रकार : आदेश व दस्तावेज फेरफाराचा दिनांक : 05/05/2021 माहिती मिळालेचा दिनांक :- 09/04/2021<br>अधिकारी : महसूल व वनविभाग<br>आदेश क्रमांक : महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-अ अधिसुचना<br>आदेश दिनांक : 20/03/2019<br>आदेशाने- बाजुस दाखल असलेल्या सर्व क्रमांकाचे मिळकतीवरील कांदळवन क्षेत्र हे महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक 199 अधिसुचना दि- 16/10/2018 आणि महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-अ अधिसुचना दि- 20/03/2019 अन्वये "राखीव वन" म्हणुन अधिसुचीत झाले आहे. त्यानुसार सदर अधिसुचीत कांदळवन क्षेत्राचा ताबा दि- 09/04/2021 रोजी मा. विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक, यांचे कार्यालयातील वनपाल आणि वनरक्षक यांचेकडे देण्यात आलेला आहे. त्यानुसार सदरच्या 7/12 इतर हक्क सदरी "राखीव वन" अशी नोंद घेणेकामी फेरफार नोंद केली असे. (नोंद- 7/12, महाराष्ट्र शासन राजपत्र, ताबा पावती, पंचनामा यावरुन केली असे)<br>स.क्र./ हि.क्र. अधिसुचीत झालेले कांदळवन क्षेत्र<br>82/अ 0.33.7 हे. आर.चौ.मी.<br>83/अ 6.02.4 हे. आर.चौ.मी.<br><br>हितसंबधितांना नोटीस बजावल्याचा दि.<br>फेरफार नोंद निर्गतीचा दि. 05/05/2021<br><br>( गणेश व्यंकट लोहार)<br>तलाठी<br>वर्सोवा साझा वर्सोवा तां. अंधेरी जि. मंबई उपनगर | 82/अ,<br>83/अ<br><br>एकूण :- 2 | महाराष्ट्र शासन राजपत्र,अधिसुचना दि-16/10/2018 व दि-20/03/2019, ताबा पावती, पंचनामा यावरुन नोंद प्रमाणित<br><br>(हेमंत दत्ताराम वरळीकर)<br>मंडळ अधिकारी:- अंधेरी<br>ता.: अंधेरी<br>जि.: मंबई उपनग्रर<br>दि.: 05/05/2021 |

"शासकीय कामासाठी निशुल्क प्रत."
दिनांक :- 03/08/2021
सांकेतिक क्रमांक :- 27220001000000011008202131

( नाव :- गणेश व्यंकट लोहार )
तलाठी साझा :- वर्सोवा ता :- अंधेरी जि :-मंबई उपनगर
तलाठी सजा वर्सोवा
तालुका-अंधेरी



Scanned by CamScanner

स्थळ :- शिवगल्ली, वर्सोवा, अंधेरी (प), मुंबई - 400 061.

## पंचनामा

दिनांक :- 29/07/2021.

आम्ही खालील सह्या करणारे पंचलोक कारणे विचारलेवरुन समक्ष हजर राहून सत्यप्रतिज्ञेवर लिहून देतो की, मौजे वर्सोवा ता- अंधेरी येथील स.क्र. 83/अ या शासकीय मिळकतीवरील कांदळवनापासून अंदाजे 50 मिटरच्या आतील अनधिकृत कच्च्या स्वरूपाचे अतिक्रमणे तसेच मासळी सुकविण्यासाठी बांधण्यात आलेले सिमेंटचे चौथरे खाडीजवळील भरणी याबाबत तक्रारदार समिती रेखा भट यांचा तक्रारी अर्ज प्राप्त झाला होता. त्यानुसार मा. तहसिलदार अंधेरी यांचेकडील क्र. तह/अंधेरी/जमिन/कांदळवन/कावि-629/2020 दि- 17/07/2021 अन्वये सदर जागेवरील अनधिकृत अतिक्रमणे निष्कासित करणेकरिता तहसीलदार अंधेरी कार्यालयातून मंडळ अधिकारी अंधेरी, तलाठी वर्सोवा, वनपरिक्षेत्र अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक यांचे कार्यालयातून वनपाल व वनरक्षक तसेच BMC मार्फत श्री. मनिष यादव सहा. अभियंता, 1 JCB मुकादम आणि वर्सोवा पोलिस ठाणे येथून 1 अधिकारी 7 पोलिस हवालदार व 2 पोलिस महिला शिपाई इत्यादी उपस्थित आहेत. त्यानुसार उपस्थित अधिकारी यांनी JCB च्या साहाय्याने शिवगल्ली वर्सोवा येथील शिवदर्शन समाज ट्रस्ट च्या कमानीला लागून असलेले कच्च्या स्वरूपाच्या 5 अनधिकृत झोपड्या पूर्णपणे निष्कासित केल्या आहेत. तसेच जागेवर मासळी सुकविण्यासाठी बांधण्यात आलेले सिमेंटचे चौथरे JCB च्या साहाय्याने पूर्णपणे निष्कासित करण्यात आले आहे. सदरची अतिक्रमित भूखंड हा कांदळवनापासून 50 मिटरच्या आत असून सदर कांदळवन जमिनीचा ताबा यापूर्वीच दि- 09/04/2021 रोजी वनविभागाकडे देण्यात आला आहे. त्यानुसार सदर मिळकतीवरील अनधिकृत अतिक्रमणे आज दि- 29/07/2021 रोजी निष्कासित करण्यात आले आहे. जागेवर कोळी लोकांनी मच्छी सुकविण्याचे साहित्य जसे बांबू, जाळी इत्यादी साहित्य प्लॅस्टिक मध्ये बांधून ठेवले आहे. सदरचे साहित्य जागेवरून लवकरात लवकर दुसरीकडे हलविण्याबाबत समज दिली आहे. सदरची कारवाई आज दुपारी 12:00 वाजता सुरु होऊन 03:30 वाजता संपविण्यात आली. वरील प्रमाणे सर्व माहिती खरी आहे. सदरचा पंचनामा वाचून कायम केला असे.

समक्ष

तलाठी वर्सोवा

S.E.(Bldg.) K/West

मंडळ अधिकारी अंधेरी
29/7/2021

पंचलोक

1) दिपक रवी नारिया -


2) अशोक लख्मा वारिया -


3) डॅनिस क्रियाडो -


Scanned by CamScanner


मौजे - वसोवा ता - अंधेरी स.क्र. ४३/अ या शासकीय - मिळकतीवरील अतिक्रमण

दि - २९/नो.













अतिक्रमण निष्कासनापूर्वी

अतिक्रमण निष्कासनानंतर









Scanned by CamScanner

RNI No. MAHBIL/2009/31733

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष ४, अंक ११७(२)] बुधवार, ऑक्टोबर १७, २०१८/आश्विन २५, शके १९४० [पृष्ठे ४, किंमत : रुपये १५.००

असाधारण क्रमांक १९९

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमान्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

महसूल व वन विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक १६ ऑक्टोबर २०१८.

अधिसूचना

**भारतीय वन अधिनियम, १९२७.**

क्रमांक. एफएलडी. ११/२०१८/प्र.क्र.६९०/फ-३.— भारतीय वन अधिनियम, १९२७ (१९२७ चा १६) च्या कलम ४ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे मुंबई उपनगर जिल्ह्यातील अंधेरी तालुक्यातील सोबतच्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेली जमीन राखीव वन म्हणून स्थापित करण्याबाबत प्रस्तावित असल्याचे घोषित करीत आहे :-

अनुसूची
तालुका अंधेरी, जिल्हा मुंबई उपनगर

| अ. क्र. | गावाचे नाव | न.भू.क्र. | एकूण क्षेत्र (हेक्टर) | चतुःसिमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | उत्तर | पूर्व | दक्षिण | पश्चिम |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| १ | वर्सोवा | ३/१/१ पै. | ३.६३.४८ | शिवगल्ली, वर्सोवा गावठाण. | खाडी | पिकरचे इन्स्टीट्यूट, अंबरनाथ टॉवर, जयभारत को-ऑप. सोसायटी. | जे. पी. रोड, शास्त्री नगर, गंगाजमूना सोसायटी. |
| | | ३/१/२ पै. | ००.७३.३८ | | | | |
| | | ३/१/३ | ००.३९.७७ | | | | |
| | | ३/१/४ | ००.५०.२९ | | | | |
| | | ३/१/८ | ००.३६.०४ | | | | |
| | | ३/१/११ | ००.०६.०६ | | | | |
| | | ३/१/१५ | ००.०२.०२ | | | | |
| | | ३/१/१७ | ००.३०.०९ | | | | |
| | | ३/१/२३ | ००.०१.१२ | | | | |
| | | एकूण. | ६.०१.४ | | | | |







Scanned by CamScanner

२. उक्त जमिनीवर किंवा त्यावर असलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या कथित अधिकारांच्या बाबतीत चौकशी करण्याकरिता आणि त्या अधिकारांचे स्वरूप व व्याप्ती शिफारस करण्याकरिता याच कलमाच्या खंड (क) अन्वये वन जमाबंदी अधिकारी म्हणून वन जमाबंदी अधिकारी, कोकण यांची नियुक्ती करीत आहेत.

३. उक्त अधिनियमाच्या कलम १७ अन्वये, महाराष्ट्र शासन, याद्वारे कलमे ११, १२, १५ व १६ अन्वये वन जमाबंदी अधिकाऱ्याने दिलेल्या कोणत्याही आदेशांवर करण्यात आलेल्या अपिलांवर सुनावणी करण्याकरिता जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांची नियुक्ती करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

वीरेन्द्र तिवारी,
अपर प्रधान मुख्य वन संरक्षक (मंत्रालय).

Scanned by CamScanner